# एन्. दत्ता - भाग ३



बी.आर. आणि साहिर या जोडीने तयार केलेल्या 'धरमपुत्र' (१९६१) ह्या चित्रपटालाही एन्. दत्ता यांनी सुरेख संगीत दिले. बासरीच्या मधुर साथीने आशा भोसले यांनी गायलेले 'मै जब भी अकेली होती हूँ, तुम चुपकेसे आ जाते हो' हे, तसेच 'क्या देखा ओ नैनावाली, नैना क्यो भर आये' ही गाणी हवीहवीशी वाटणारी आहेत. ह्या चित्रपटात महेन्द्र कपूरलाही सुरेख गाणी मिळाली आहेत. 'ये मस्जिद है वो बुतखाना, चाहे ये मानो, चाहे वो मानो' हे कोरस सह महेन्द्र आणि बलबीरचे गाणेही छान आहे. 'आज की रात नही शिकवे-शिकायत के लिये' हे महेन्द्रचे आणखी एक सुंदर गाणे ! कोरससह महेन्द्र यांनी देशभक्तीपर जोषांत म्हटलेले 'जय जननी जय भारत माँ!' हे गाणेही चांगले आहे. तसेच 'भूल सकता है भला कौन येह प्यारी आँखे' हे परत महेन्द्रचेच गाणे - 'धूल का फूल' नंतर थोडं अंतर घेऊन एन्. दत्ता यांनी या चित्रपटात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मधल्या काळात त्यांनी 'जाल साझ', 'मि. जॉन', 'नाच घर', 'डॉ. शैतान' आणि 'रिक्षावाला' अशा विस्मरणीय चित्रपटांना संगीत दिले.

त्यानंतर 'दिल की तमन्ना थी मस्ती मे, मंझिलसे भी दूर निकलते' हे रफीचे झपाटून टाकणारे गाणे असलेला 'ग्यारा हजार लडकियाँ' हा चित्रपट आला. त्यानंतर, आशा, बलबीर, रफी आणि कोरस यांनी गायलेल्या 'मेरी तस्वीर लेके क्या करोगे तुम' ही कव्वाली असलेला 'काला समुन्दर'. १९६२च्या ह्याच चित्रपटातील 'आपकी बाते, आपकी कसमे, सब झूठे अफसाने है' हे आशाच्या गोड गळ्यातून आलेले साधे सोपे सुबोध गाणे ! त्यानंतर 'तेरा आना भी धोका था' ह्या रफीने गायलेल्या 'मेरे अरमान मेरे सपने' (१९६३) मधल्या गाण्याबद्दल तुम्ही काय म्हणाल ? नंतरच्या १९६४च्या 'चांदी की दीवार'मध्ये साहिरने लिहिलेले आणि तलतने गायलेले 'अश्कोंमे जो पाया है, वो गीतोंमे दिया है' हे हृदयाचा ठोका चुकवणारे गाणे कसे वाटते ? 'यादोंका सहारा ना होता, हम छोड के दुनिया चल देते' ही गीतकार पाल प्रेमी यांनी लिहिलेली, दत्ता यांनी संगीतबध्द केलेली आणि तलत यांनी गायलेली, १९६९ साली प्रदर्शित

झालेल्या 'पत्थर का ख्वाब' या चित्रपटातील गझल म्हणजे अनमोल रत्नच आहे.

'मरहबा, मरहबा (अरेबिक मध्ये 'स्वागत असो'), ऐ हुस्न-ए-यार मरहबा' हे १९७० साली आलेल्या 'इन्स्पेक्टर' या चित्रपटातील एन्. दत्ता यांनी अरेबिक चालीवर बांधलेले गाणे स्वरमधुर आहे. तसेच आशाने 'नया रास्ता' मध्ये गायलेले 'जान गयी मै तो जान गयी' ह्या गीताची चालही सुंदर आहे. ह्याच चित्रपटातील 'पोंछकर अश्क अपनी आँखोंसे, मुस्कराओ तो कोई बात बने' हे रफीचे आणखी एक गाणे. एकंदरीत एन्. दत्ता यांची बहुतेक सर्वच गाणी व्यवस्थित विचार करून बांधलेली होती.

एन्. दत्ता हे त्यांच्या कारकिर्दीच्या शेवटच्या ७-८ वर्षांत जास्त करून बी आणि सी ग्रेडच्या चित्रपटांचे संगीत करीत होते. त्यामध्ये दारासिंग, रंधवा, सरोजादेवी, जबीन, सुशीलकुमार, सलीम दुरानी, झेब रहमान, इ. कलाकार काम करीत होते. तसेच ते कमल बारोट, सुमन वगैरेंना गाण्यासाठी बोलवत असत. अस्सल धान्यापासून कोंडा वेगळा करून त्या धान्याचे मूल्यमापन करणे योग्य ठरेल. एन्. दत्ता यांचे अस्सल गीत सोन्याहून जास्त पिवळे होते.

ज्यांनी एन्. दत्ता यांच्या बऱ्याच चित्रपटांत सहाय्यक म्हणून काम केले त्या बाबुराव हिंदळेकरांच्या मते त्यांची गाणी म्हणजे चोख सोने होते. ७८ वयाचे बाबुराव, मुंबईतील सी. पी. टँक येथील त्यांच्या भरपूर व्यग्र अशा म्युझिक स्कूलमध्ये गायन आणि वाद्यांचा क्लास घेतात. त्यांच्या मते बी. आर. चोप्रांच्या 'साधना'मध्ये खरे तर प्रथम जयदेव यांना घेतले होते, परंतु लवकरच प्रदर्शित होणाऱ्या 'ब्लॅक कॅट' या चित्रपटातील 'तुम्हीसे ये पूँछती हूँ' हे गाणे ऐकल्यावर यश चोप्रांनी या गाण्याच्या संगीतकारालाच 'साधना'मध्ये घेण्याचे पक्के केले.

तुम्ही किंवा मी अंदाज करू शकतो की एव्हढा गुणी संगीतकार कुणाच्या तरी राजकारणाचा बळी ठरला असणार.

आता इथेच थांबलेलेले बरे !

(समाप्त)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No

matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com